


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**


तारुण्याचा जोम अंगी आहे
तोवरच कोणतीही गोष्ट शक्य होईल,
कार्याला लागण्याची अत्यंत उचित
अशी हीच वेळ आहे...

वर्ष : ०५ | अंक : ०८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ...अखेर त्या 'मानवी सापळ्याचे' सत्य उघड!

### मानवी सापळ्याच्या अफवांना येरवडा पोलिसांचे चोख प्रत्युत्तर





**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२२, येरवडा (पुणे) :** येरवडा भागात दोन दिवसांपूर्वी 'मानवी सापळा' सापडल्याच्या अफवेने मोठी खळबळ उडवून दिली होती. या अफवेला जोरदार ऊत आला आणि परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र आता पुणे येरवडा पोलिसांनी या प्रकरणात धक्कादायक सत्य समोर आणले आहे. तो तथाकथित 'मानवी सापळा' नसून, एका प्रयोगशाळेत वापरला जाणारा तांत्रिक आणि वैज्ञानिक हेतूने तयार केलेला नमुना असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे 'मानवी सापळा' सापडल्याच्या बातम्यांना आता पूर्णविराम मिळाला असून, या अफवा पसरवणाऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणात पुणे येरवडा पोलिसांनी कुठल्याही दबावाला बळी न पडता, तांत्रिक आणि वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून तपास केला. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने अत्यंत पारदर्शकपणे ही चौकशी केली. त्यांनी तज्ज्ञांच्या मदतीने प्रत्येक तपशिलाची काटेकोर पडताळणी केली. त्यांच्या तपासानुसार, तो सापळा मानवी शरीराचा भाग नसून वैज्ञानिक प्रक्रियेसाठी वापरले जाणारे एक साधन असल्याचे स्पष्ट झाले.

येरवडा पोलिसांच्या या कामगिरीमुळे केवळ येरवडा परिसरातीलच नव्हे, तर संपूर्ण पुणे शहरातील अफवा आणि गैरसमज दूर झाले आहेत. या घटनेतून हे अधोरेखित झाले आहे की अफवा कितीही मोठ्या पसरल्या तरी सत्याला झाकता येत नाही. येरवडा पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि काटेकोर तपासामुळे खोट्या माहितीचा फोलपणा उघडकीस आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके आणि त्यांच्या पथकाने दाखवून दिले आहे की, अफवांवर विश्वास ठेवण्यापेक्षा अधिकृत तपासाच्या निष्कर्षाची वाट पाहणे महत्त्वाचे आहे. या घटनेतून समाजाने शिकण्यासारखे म्हणजे अफवा पसरवण्याऐवजी सत्य शोधण्याचा आग्रह धरला पाहिजे. येरवडा पोलिसांच्या या पारदर्शक व धाडसी तपासामुळे नागरिकांमध्ये विश्वास दृढ झाला असून, अखेर सत्याचा विजय झाला आहे.

## देह व्यापाराच्या जाळ्यातून महिलेची सुटका ! आरोपीला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या पथकाने मुक्तीनगर, मच्छीनाला परिसरात देह व्यापाराच्या प्रकरणात कारवाई केली. या कारवाईत एका महिलेची सुटका करण्यात आली असून, अमर शशिकांत द्विवेदी (रा. मुक्तीनगर, मच्छीनाला, चंद्रपूर) यास अटक करण्यात आली आहे.

मंगळवारी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे ही धाड टाकण्यात आली. आरोपीच्या राहत्या घरी पंचासमक्ष पाहणी केल्यानंतर तेथे एक महिला आढळून आली. चौकशीअंती आरोपीने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी तिच्याकडून देह व्यापार करुन घेत असल्याचे कबूल केले. याप्रकरणी पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून, आरोपी अमर द्विवेदी यांच्याविरुध्द रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई विशेष पोलीस अधिकारी अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर व सर्वेश बेलसरे, सहायक फौजदार धनराज करकाडे, हवालदार चेतन गज्जलवार, सुरेंद्र महतो, प्रफुल्ल गारघाटे, सुमित बरडे, शशांक बादामवार, छाया निकोडे, अपर्णा मानकर, उषा लेडांगे आदींनी केली.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुक अंतिम प्रभाग रचना जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, बुलडाणा :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नुसार बुलडाणा जिल्हा परिषद तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या १३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुक -२०२५ अनुषंगाने प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्यात आल्या आहेत.

सदर अंतिम प्रभाग रचना परिशिष्ट ८ (अ) व परिशिष्ट ८ (ब) या स्वरूपात तयार करण्यात आलेली असून ती आज दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व पंचायत समिती व तहसिल कार्यालयांचे सूचना फलक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्लूहाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

या अंतिम प्रभाग रचनेच्या प्रकाशनामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भातील प्रक्रिया पुढे वेगाने गतीमान होणार असून, निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार व मतदारांना प्रभाग रचनेबाबत सुस्पष्ट माहिती मिळणार आहे.

# राज्याची पाणीचिंता मिटली! मोठ्या धरणांमध्ये ८८.६५ टक्के पाणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** राज्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरणांमध्ये पाण्याची चांगली आवक झाली असून, मोठ्या धरणांमध्ये गुरुवारपर्यंत ८८.६५ टक्के पाणी उपलब्ध असल्याची माहिती जलसंपदा विभागाने गुरुवारी दिली. त्यामुळे राज्याची पाणीचिंता मिटली आहे.

जलसंपदा विभागाने गुरुवारी राज्यातील सर्व प्रमुख धरणांतील पाणीसाठ्याचा अहवाल जाहीर केला. यानुसार, राज्यातील मोठ्या प्रकल्पांअंतर्गत एकूण १३८ धरणांमध्ये ८८.६५ टक्के पाणी उपलब्ध आहे. त्यामध्ये २५८००.३३ दशलक्ष घनमीटर इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. या १३८ मोठ्या प्रकल्पांमध्ये नागपूर विभागामधील १६, अमरावती विभागामधील १०, छत्रपती संभाजीनगरमधील ४४, नाशिक येथील २२, पुणे येथील ३५ आणि कोकणातील ११ धरणांचा समावेश आहे.

तीन विभागांमध्ये धरणांतील पाणीसाठा ९० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. यात कोकणातील ११ धरणांमध्ये सर्वाधिक ९४.६८ टक्के पाणीसाठा आहे. त्यापाठोपाठ पुण्यातील धरणांमध्ये ९४.०८ टक्के, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ९०.०७ टक्के पाणी आहे. नाशिकच्या धरणांमध्ये ८५.५२ टक्के, अमरावतीमध्ये ८५.०३ टक्के आणि नागपूर येथे ६८.८५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.



### कोकण विभागात सर्वाधिक ९४.६८ टक्के पाणीसाठा

मोठ्या धरणांमधील पाणीसाठा (दलघमी)

| विभाग | यावर्षीचा पाणीसाठा | गेल्यावर्षीच्या पाणीसाठा |
|---|---|---|
| नागपूर | ६८.८५ | ७९.५३ |
| अमरावती | ८५.०३ | ६४.१६ |
| छ.संभाजीनगर | ९०.०७ | ३२.८७ |
| नाशिक | ८५.५२ | ७५.६२ |
| पुणे | ९४.०८ | ९०.७२ |
| कोकण | ९४.६८ | ९४.५९ |
| **एकूण** | ८८.६५ | ७६.७० |

दरम्यान, राज्यात येत्या २४ तासांसाठी पुणे घाट परिसरात ऑरेंज अ‍ॅलर्ट देण्यात असून, भारतीय हवामान विभाग आणि राष्ट्रीय रिमोट सेन्सिंग केंद्र या केंद्रीय संस्थेशी सतत संपर्क साधून पुढील हवामानाच्या अंदाजाची माहिती देत आहे.

**गेल्या वर्षीच्या तुलनेत दिलासा...**

राज्यातील सर्व धरणांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा अधिक असल्याचे दिसते. मोठ्या प्रकल्पाअंतर्गत असणाऱ्या धरणांमध्ये गेल्या वर्षी याच दिवशी ७६.७० टक्के इतका पाणीसाठा होता. तो यंदा ८८.६५ टक्क्यांवर पोहचला आहे. मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या धरणांमध्ये गेल्या वर्षी ६१.९२ टक्के इतका साठा होता, हा आकडा यंदा ७४.८४ टक्क्यांवर आहे. लघू प्रकल्पांतर्गत धरणांमध्ये गेल्या वर्षी ४०.५० टक्के पाणी शिल्लक होते. या धरणांमध्ये सध्या ५०.६८ टक्के पाणीसाठा असल्याचे सांगण्यात आले. त्याशिवाय, महाराष्ट्र राज्य प्रकल्पांतर्गत येणाऱ्या धरणांमध्ये गेल्या वर्षी याच दिवशी ६९.४० टक्के पाणीसाठा होता. तो यंदा थेट ८१.२२ टक्क्यांवर पोहोचला.

## जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी – आ.विलास तरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, वसई (पालघर) :** पालघर जिल्ह्यासह वसई, नालासोपारा, विरार शहरासह व पालघर ग्रामीण तालुक्यासह बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित ग्रामस्थांच्या पुनर्वसन व तात्काळ मदतीसंदर्भात प्रभावी उपाययोजना करावी अशी जोरदार मागणी आमदार विलास तरे यांनी पालघर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष डॉ. इंदूराणी जाखड यांना निवेदन देऊन केली आहे.

यावेळी आमदार विलास तरे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पालघर जिल्ह्यासह वसई व पालघर तालुक्यात सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामस्थांचे प्रचंड हाल झाले असून त्यांच्या उपजीविकेवर, आरोग्यावर व दैनंदिन व्यवहारांवर गंभीर परिणाम झाला आहे. सदर परिस्थितीत काही गंभीर समस्या निदर्शनास येत आहेत की, अनेक गावे व वस्त्यांमध्ये पाणी शिरल्यामुळे कच्ची घरे, झोपड्या तसेच घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी ग्रामस्थांना आपली घरे सोडून सुरक्षित स्थळी जावे लागले आहे, पावसामुळे रस्ते वाहून गेल्याने आणि वाहतूक विस्कळीत झाल्याने जीवनावश्यक




वस्तूंचा पुरवठा खंडित झाला आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नियमित न झाल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने भात, भाज्या, फळबागा व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी शेतकरी वर्गावर आर्थिक संकट ओढावले आहे, पाणी साचून राहिल्याने डासांचे प्रमाण वाढले असून साथरोगांचा धोका गंभीर स्वरूप धारण करीत आहे. लहान मुले, वृद्ध व महिला यांचे आरोग्य विशेषतः धोक्यात आले आहे.

वरील परिस्थितीच्या अनुषंगाने विचार करता, आपल्यामार्फत बाधित ग्रामस्थांना शासकीय रेशन दुकानदारामार्फत अन्नधान्य, धान्य, डाळी, तेल इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा, पूरग्रस्त कुटुंबांचे तात्काळ सर्वेक्षण करून त्यांना आवश्यक ते निवारा, कपडे व इतर वस्तू उपलब्ध करून द्याव्यात, शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे महसूल विभागामार्फत तातडीने करून त्यांना पीकविमा व आर्थिक मदत देण्यात यावी, आरोग्य विभागामार्फत बाधित भागात वैद्यकीय पथके तैनात करून आरोग्य शिबिरे भरवावीत व आवश्यक औषधांचा पुरवठा करावा, निचरा व स्वच्छतेच्या दृष्टीने ग्रामपंचायती व महानगरपालिकांसोबत समन्वय साधून नाले, गटारे व पाणी साचलेली ठिकाणे तातडीने स्वच्छ करावीत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आपत्कालीन निधीचा वापर करून बाधितांना त्वरित आर्थिक मदत वाटप करण्यात यावी, बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी मध्ये रस्ते सुधारणे व स्वच्छता करणे, आवश्यक असून तातडीने उपाययोजना करण्याबाबत यावी, अशी जोरदार मागणी आमदार विलास तरे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष डॉ. इंदूराणी जाखड यांच्या कडे केली आहे. पालघर जिल्हा व वसई-पालघर तालुका, बोईसर - तारापूर एम.आय.डी.सी. ही लोकसंख्येच्या दृष्टीने घनदाट असून सद्यस्थितीत अतिवृष्टीमुळे गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे बाधित ग्रामस्थांना तात्काळ दिलासा मिळावा यासाठी आपण तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून जिल्हा प्रशासनामार्फत योग्य तो दिलासा द्यावा, असे ही आमदार तरे म्हणाले.

## राष्ट्रीय व राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोजित 'शक्ती संवाद' परिषदेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून, यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'शक्ती संवाद' कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आवडे, यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्या संदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून, दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन – मंथन होणार आहे. या महत्वपूर्ण चर्चेचा सकारात्मक विचार करून धोरणात्मक निर्णय घेतले जातील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

विकसित अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्वाची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहेत. महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिले नसून आर्थिक परिवर्तनाच्या उपक्रमासाठी आवश्यक आहेत.

मुलींच्या सबलीकरण व संरक्षणासाठी सुरू केलेल्या 'बेटी बचाव – बेटी पढाओ' योजनेपासून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी 'लखपती दीदी' पर्यंतच्या योजना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत. एक करोड महिलांना 'लखपती दीदी' बनविणार असल्याचा विश्वास यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.




## आभाळ फाटले...

गेल्या चार दिवसांच्या मुसळधार पावसाने मुंबईपासून ते विदर्भापर्यंत जवळपास संपूर्ण महाराष्ट्राची केविलवाणी स्थिती करून टाकली आहे, त्याला निसर्गाच्या अवकृपेइतकीच प्रशासन यंत्रणांची निष्क्रियताही कारणीभूत आहे.

अतिवृष्टीने मुंबईचे जनजीवन विस्कळित केले, तर मराठवाड्यात नांदेडमध्ये मुखेड तालुक्यात आजवर कधीच झाला नव्हता, इतक्या पावसाने नागरिकांची घरेदारे उद्ध्वस्त करून टाकली. राज्यभरात गेल्या पाच दिवसांत २९ बळी गेले, त्यापैकी ११ मराठवाड्यातील आहेत. राज्यातील अनेक शहरांमध्ये या पावसात रस्त्यांनी ओढ्यानाल्यांचे रूप धारण केले आणि राज्यात ठिकठिकाणी नद्यांनी काठांवरून नागरी वस्त्यांमध्ये धाव घेतली. राज्यातील बारा लाख हेक्टर शेती बाधित झाली असून आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होऊ लागली आहे. केवळ सहा तासांत दोनशे मिलिमीटर, तर २४ तासांत साडेतीनशे मिलिमीटर अशा पावसाने मुंबईकरांना २६ जुलै २००५ ची आठवण करून दिली. पावसाच्या या तडाख्यातून कोणीही सुटले नाही. रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे रद्द झाल्या, रस्त्यांवर साचलेल्या कमरेइतक्या पाण्यात बस-रिक्षासह वाहने अडकली, ‘ मोनोरेल ’ खांबावरच बंद पडून प्रवाशांचे प्राण कंठाशी आले, तर धावपट्टीवर पाणी साचल्याने विमानांनाही हवेतच चकरा माराव्या लागल्या. ही निसर्गाची अवकृपा खरीच; पण केवळ त्याकडे बोट दाखवून राज्यकर्ते आणि प्रशासनाला मोकळे होता येणार नाही. ‘मुंबई स्पिरिट’च्या गोंडस नावाखाली दर पावसाळ्यात अनन्वित हाल सहन करणाऱ्या मुंबईकरांची आणखी किती परीक्षा पाहणार, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्थानकांवर गर्दीत गुदमरणाऱ्या चाकरमान्यांना आणि घरांत पाणी शिरल्याने उद्ध्वस्त झालेल्या संसाराकडे हताशपणे पाहणाऱ्या मुंबईकरांना ‘रेड’ किंवा ‘ऑरेंज’ ॲलर्टविना सरकार काहीही देऊ शकत नाही, ही स्थिती प्रगतिशील महाराष्ट्राला शोभणारी नाही. मिठी नदीतील गाळ काढणे किंवा नालेसफाईचे पितळ या एकाच पावसाने उघडे पाडले. समुद्राला आलेली भरती, हे नैसर्गिक कारण; पण अपुरी ड्रेनेजव्यवस्था आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये रस्त्यांवर- गल्लीबोळांमध्ये जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतून पाणी जमिनीत मुरण्यास अटकाव करण्याचा अट्टहासही शहरांच्या मुळावर येत आहे. प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पाणी वाहून जाण्यास आपण अडथळा निर्माण करीत आहोत, हे नागरिकांनीही लक्षात घेतले पाहिजे. मराठवाड्यातही नांदेड, बीडसह आसपास पावसाने दणका दिला. आयुष्यात इतका पाऊस पाहिला नव्हता, असे मुखेड तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक सांगतात. तरीही काठावरील गावांचे पुनर्वसन करण्यापूर्वीच लेंडी प्रकल्पाची घळभरणी करण्याच्या घाईमुळे अडवलेले पाणी गावांत शिरून मोठ्या दुर्घटनेला सामोरे जावे लागल्याचा नागरिकांचा आरोप आहे. त्याचीही चौकशी झाली पाहिजे. या पावसाने राज्यातील बारा ते चौदा लाख हेक्टरवरील उभ्या पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती आहे, तर कोकणातील अनेक गावे दरड कोसळण्याच्या भीतीच्या छायेखाली जगत आहेत.

पावसाचा अंदाज देणारी यंत्रणा अधिक अद्ययावत आणि अचूक असणे किती गरजेचे आहे, याची जाणीव या निमित्ताने होते; त्याबरोबरच निसर्गावर किती अतिक्रमण करायचे, याचीही मर्यादा आखून घेतली पाहिजे. राज्यातील अनेक शहरांत थेट नदी-ओढ्यांची पात्रे अडवून-वळवून अतिक्रमण झाले आहे, ठिकठिकाणी डोंगर फोडून केलेली विकासकामे दरडींना निमंत्रण देत आहेत.

पश्चिम घाट वाचविण्यासाठी तज्ज्ञ देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून होणारा हा तथाकथित विकास नागरिकांचा काळ ठरू नये. तसेच या संकटकाळातही राजकारण करण्याची खोड अनेकांना जडली असून ‘तुमच्या काळात किती पाणी साठले आणि आमच्या काळात काय झाले,’ या आरोप-प्रत्यारोपांना आवर घातला पाहिजे. लष्कर, एनडीआरएफ, सरकार आणि स्थानिक प्रशासन सध्या बचावकार्यात गुंतले आहे. बाधितांची घरेदारे पुन्हा उभी करणे, नुकसानाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे, ही काळाची गरज आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे; त्याबाबतही साधकबाधक विचार करून सरकारने तिजोरी खुली करावी. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडातील भयकारी घटनांनंतर काही दिवसांतच महाराष्ट्रात आलेल्या या पूरस्थितीने हे संकट आपलेही दार ठोठावत आहे, याचे भान ठेवले पाहिजे.

# जेव्हा मुलं आपली चप्पल घालू लागतात...

अठरा वर्षानंतर मुलं प्रौढ होतात. चांगलं-वाईट, खरं-खोटं आणि बऱ्यापैकी दुनियादारी त्यांना समजू लागते. स्वतःच्या भविष्याबाबत मुलं जागरूक झालेली असतात. पोरकटपणा जाऊन पोक्त विचार करण्याची उंची त्यांनी गाठलेली असते. अशा काळात मुलं शारीरिक दृष्ट्या आपल्या बापाइतकी बलदंड झालेली असतात, तर मुली देखील आपल्या आईइतक्या समजदार बनलेल्या असतात.

ज्यांना आपण आपल्या अंगावर, खांद्यावर खेळवलं, तीच मुलं आता आकाशाला गवसणी घालायला तयार झालेली असतात. त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी वेळ प्रत्येक आई-वडिलांनी काढलाच पाहिजे. जेव्हा मुलं आपली चप्पल घालू लागतात, त्यावेळी खरंतर आपल्याला नवे मित्रच मिळालेले असतात. शारीरिक वाढीसोबत त्यांच्यात आलेल्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक प्रगल्भतेची आपण या काळात कदर केली पाहिजे. बाप से बेटा सवाई अशी एक म्हण आहे. त्यानुसार आपली मुलं आपल्यापेक्षा वरचढ असतात; हे आपण मान्य केलं पाहिजे. त्यांचा वरचढपणा आता स्पष्ट दिसू लागतो. आजच्या काळात आपल्यापेक्षा त्यांना स्थैर्य मिळवण्यासाठी जास्त कष्ट घ्यावे लागणार आहेत. स्वतःला सतत अपडेट करत राहावं लागणार आहे. तोल जाण्याचे आणि प्रलोभनांचे क्षण त्यांच्यासमोर अनेक वेळा येणार आहेत. अशा वेळी उपदेशाचे डोस त्यांना सतत पाजून कंटाळून सोडण्यापेक्षा, आपले स्वतःचे अनुभव सांगणे अधिक सोयीचे ठरेल. आपण केलेला संघर्ष, लागलेल्या ठेचा, झालेल्या चुका, भेटलेली माणसं, सहन केलेला अपमान, मिळालेला सन्मान, करायच्या राहून गेलेल्या गोष्टी असं स्वतःबद्दल सांगून आपण त्यांच्याशी मित्रत्वाचे नवे संबंध जुळवू शकतो.

मुलांकडूनही त्यांच्या विश्वातील नव्या काळाच्या आणि पिढीच्या गोष्टी समजून घेता येतात. तंत्रज्ञानाबाबत होणारे बदल त्यांच्याकडून जाणून घेता येतात. जगामध्ये घडणाऱ्या नव्या घटनांवर त्यांची मतं ऐकता येतात. त्यांचे भविष्याचे नियोजन, ध्येयं आणि स्वप्नं आपल्याला समजू शकतात.आपली मुलं ही आता फक्त आपली राहिली नाहीत, हे आपल्याला ध्यानात घ्यायला हवं. अठरा वर्षांनंतर आपल्या देशात मतदानाचा हक्क मिळतो, म्हणजेच ही मुलं आता समाजाची, देशाचीच नव्हे तर ग्लोबलायझेशनच्या युगात जगाची नागरिक बनलेली असतात. त्यांच्या मनामध्ये समाजाबद्दल उत्तरदायित्वाची भावना कशी निर्माण होईल, याकडे लक्ष दिलं पाहिजे. मुलांकडून पराकोटीच्या अपेक्षा करण्यापेक्षा किंवा अपेक्षांचं ओझं त्यांच्या डोक्यावर टाकण्यापेक्षा चर्चेतून त्यांचा कल ओळखला पाहिजे.

’ हेलिकॉप्टर पालकत्व ’ म्हणजे मुलांच्या डोक्यावर हेलिकॉप्टरसारखं फिरत राहणं होयत्यांच्या सुरक्षेसाठी आणि यशासाठी सतत काळजी वाहणे होय. परंतु आता मुलांना स्वतंत्र करण्याची सुरुवात झाली पाहिजे. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यासाठी आणि करिअरच्या निवडीबाबत त्यांना मोकळीक द्यायला हवी.’वाघाचं पालकत्व ’म्हणजे मुलांना नेहमी धाकात ठेवणे. मुलांनी त्यांच्या क्षेत्रात सर्वात पुढे राहिलंच पाहिजे किंवा सर्वाधिक गुण मिळवलेच पाहिजेत म्हणून कठोरपणे वागणे. अशा प्रकारच्या पालकत्वातून मुलांमध्ये तणाव वाढतो आणि आत्महत्येसारख्या घटना घडतात.

या वयात मुलं कॅम्पस लाईफसाठी तयार होतात. यासाठी त्यांना पूर्णपणे तयार होण्यासाठी वेळ लागतो. रोजच्या दिनचर्येमध्ये बदल करावे लागतात. महिन्याभराचं स्वतःचं बजेट तयार करावं लागतं. स्वतःची कपडे धुवावी लागतात. मेसमधील जेवण त्यांना आवडत नाही, त्यामुळे बाहेरच्या चटपटीत खाण्याचा मोह होऊ शकतो. त्यासाठी त्यांना मानसिक व भावनिकरीत्या तयार करावं लागतं.या वयात प्रयोग करण्याची मुलांची उत्सुकता वाढलेली असते. जीवनातील वेगवेगळे अनुभव घेण्याविषयी त्यांच्यात ओढ निर्माण झालेली असते. तेव्हा चांगल्या-वाईट गोष्टींबाबत पुसटशी कल्पना आपण द्यायला हवी, परंतु त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षताही घ्यावी. शेवटी, आपण मुलांसोबत कायम असणार आहोत, ही खात्री आणि विश्वास आपण देऊ शकलो, तर त्यांच्या प्रौढ होण्याला खरा अर्थ देता येईल.



**-किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो.९९२२८८२५४१**

# राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळालेली हाली बरफ आज पण बेरोजगार!

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील हाली बरफ या आदिवासी कन्येने लहान वयात आपल्या स्वतःच्या बहिणीचे प्राण वाघाच्या हल्लयातून वाचवले, ही घटना संपूर्ण देशभर गाजली होती. तिच्या या पराक्रमाबद्दल तिला देशाचे पंतप्रधान यांच्या हस्ते राष्ट्रीय शौर्य पुरस्कार बहाल करण्यात आला. तिच्या शौर्याची नोंद आज महाराष्ट्रातील शालेय पाठ्यपुस्तकांत आहे. शहापूर तालुक्यातील व आदिवासी समाजाचा हा अभिमान असून, हीच मुलगी सध्या बेरोजगारीच्या गर्तेत सापडली आहे.

हाली बरफ मागील काही वर्षांपासून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर अंतर्गत खर्डी येथील मुलींच्या वस्तीगृहात रोजंदारीवर काम करत होती. त्याआधी तिने शासकीय आश्रम शाळा पेंढरघोळ व शासकीय मुलींचे वस्तीगृह शहापूर येथेही सेवा बजावली होती. परंतु मागील सहा महिन्यांपासून तिच्या हाताला काम नाही. परिणामी जगण्यासाठी तिला गावागावांत मजुरी करावी लागत आहे. जंगलातील गवत कापून ते विकून जगावे लागत आहे. एकीकडे स्वतःच्या बहिणीचे प्राण वाचवणाऱ्या आणि वाघाशी झुंज देणाऱ्या या धाडसी आदिवासी कन्येला देशभरातून गौरवले जाते, तिच्या शौर्यकथेवरून विद्यार्थी प्रेरणा घेतात, परंतु शासनाने तिला आजवर कायमस्वरूपी नोकरी वा रोजगाराचा आधार दिला नाही, ही बाब समाजाला वेदनादायी व लज्जास्पद ठरली आहे. श्रमजीवी संघटना शहापूर तालुका यांच्यावतीने या संदर्भात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर प्रभारी प्रकल्पाधिकारी श्री. दिवाकर काळपांडे साहेब यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. हाली बरफ हिला तातडीने कायमस्वरूपी नोकरी द्यावी किंवा शासकीय सेवेत समाविष्ट करून तिच्या शौर्याचा सन्मान करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील, असा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदन देताना शहापूर तालुका सचिव प्रकाश खोडका आणि तालुका युवा प्रमुख रुपेश अहिरे तसेच स्वतः हाली बरफ उपस्थित होत्या.



## पोळा...

असे असतात बैल  
चित्रे दाखवी बाळा  
बळी राजा दिवाळी  
सण आगळा पोळा

व्हिडिओवर दाखवे  
निनाद घुंगुरु माळा  
पुरणपोळी सुखाची  
असा रंगतो सोहळा

बैल अत्यंत उपयुक्त  
ऐकता लागलालळा  
सेवा करी भूमातेची  
पटले त्या लडिवाळा

ट्रॅक्टर्स ट्रेलर नाविन्य  
आधुनिकतेचा मळा  
काम ना बैलजोडीस  
वेळ सगळा मोकळा

उरी जपली कृतज्ञता  
जाणे सुगंधी निर्मळा  
कळो अर्थ पोळ्याचा  
अमृत पोचले ते मुळा

नातीच्या खोल डोळा  
पाणी वाही घळाळा  
निर्झरास बांध फुटला  
आपुलकीचे खळाळा

आबायंदा दणक्यात  
साजरा करू पोळा  
मित्र माझे शहरातले  
सगळे होणारं गोळा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# राष्ट्रीय अंतराळ दिवस !!

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला. या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे.



२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते. याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली. चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खारघर वाशीयांचा पाणी प्रश्न लागणार कायमचा मार्गी

## ओवे धरण प्रकल्प होणार पुनर्जीवित; प.न.पा करणार ५ कोटींचा खर्च

**अक्षराज : दत्तात्रय शिंदे**

**दि.२२, खारघर (नवी मुंबई) :** पनवेल ग्रामीण, (वा.) खारघर मधील नागरिकांची पाण्याची गरज भागवण्यासाठी ओवे येथील धरण पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून घेण्यात आला आहे.

या करता ५.०८ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. ओवे येथील धरणाचे पुनरुज्जीवन करण्याची तसेच पांडव कडा येथून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करण्यासाठी धरण बांधण्याची मागणी माजी नगरसेवक आणि पाणीपुरवठा व मल: निस्सारण समितीचे माजी सभापती नीलेश बाविस्कर यांनी पालिकेकडे केली होती.

बाविस्कर यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठं यश आलं या असून पालिकेने त्यांच्या मागणीची दखल घेत पालिकेकडून हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे ओवे धरणाच्या जवळपासच्या गावांना तसेच खारघर शहरातील काही रहिवासी संस्थांना ०.७५ एमएलडी ते १.५ एमएलडी पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे मत बाविस्कर यांनी व्यक्त केले आहे.

खारघर वसाहतीलगत असलेल्या ओवे गावात ०.१६ दश लक्ष घनमीटर एवढ्या क्षमतेचे लहान धरण आहे. महापालिका स्थापनेपूर्वी तळोजा ग्रामपंचायतीचे हे धरण होते. १९६२ मध्ये बांधण्यात आलेल्या या धरणातून तळोजा ग्रामपंचायत मधील नागरिकांना पाणी पुरवण्यात येत होते.

रायगड जिल्हा परिषदेने या धरणाकडे दुर्लक्ष केल्याने धरणातील पाणी वापराविना वाया जात होते. ओवे धरण खोलीकरणाचा सध्या कोणताही प्रस्ताव नसला. तरी धरण पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. या करता होणाऱ्या निधीचा वापर पालिकेकडून उपलब्ध



करून देण्यात आलेल्या निधीतून २० अश्वशक्तीचा सबमर्सिबल पंप, ३५० मीटर लांब आणि १५० मिमी व्यासाची कच्च्या पाण्याची पाईपलाईन, १.५ लिटर क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प आणि १.७४० किलोमीटर लांबीची २०० मिमी व्यासाची पाईपलाईन सोबत एक पॅनेल चेंबरचा समावेश आहे. असे माजी नगरसेवक बाविस्कर यांनी समाज माध्यमांना सांगितले.

# बिबी लघुपाटबंधारे प्रकल्पात ४० टक्के पाणीसाठा

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** गेल्या कित्येक वर्षापासून रखडलेल्या बिबी धरणाची घळभरणी अखेर पूर्ण झाली आहे. यंदा ऑगस्ट महिन्यापासून धरणात पाणीसाठा करण्यास सुरूवात केली आहे. यावर्षी ४० टक्के पाणीसाठा धरणात झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या समाधानाचे वातावरण असून या धरणातील पाण्याचा फायदा बारमाही बिबी, सुरुल, पाटण, म्हावशी या गावांना होणार आहे. मात्र धरणात पाणी साठवण्याचे हे पहिलेच वर्ष असून बिबी, सुरुल, पाटण व केरा नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हे लघुपाटबंधारे धरण बिबी येथील येडोबा ओढ्यावर असून ओढ्यात पाण्याचा प्रवाह वाढल्यास पाण्यामध्ये जाण्यास नागरीक तसेच जनावरांना सक्त मनाई असल्याचा आदेश कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सातारा वरुण मोटे यांनी जून महिन्यातच



काढला आहे.

लघुपाटबंधारे तलाव बिबी, ता.पाटण, जि.सातारा या बांधकामामधील प्रकल्पास शासनाने दि.१० मार्च २०२५ रोजी प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्प बिबी येथील येडोबा ओढ्यावर आहे. प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २.६०३ दशलक्षघन मीटर इतका आहे.

सदर धरणाची लांबी ७२० मीटर असून उंची २८.८३ मीटर इतकी आहे. सदर प्रकल्पामुळे पाटण तालुक्यातील बिबी, सुरुल, पाटण, म्हावशी या गावांतील एकूण ६७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीस बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे.

सध्या बिबी लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या घळभरणीचे काम पूर्ण झालेले आहे. चालू वर्षी धरणामध्ये प्रथमतः पाणीसाठा करण्याचे नियोजन जून महिन्यापासून विभागाने केले होते. त्यानुसार सध्याच्या घडीला बिबी प्रकल्पात जवळपास ४० टक्के पाणीसाठा करण्यात आला आहे. त्यामुळे धरणाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे सलतेवाडी व धरणाच्या अजू बाजूकडील मौजे बिबी, सुरुल, पाटण व म्हावशी या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

बिबी प्रकल्पाची सुरूवात १९९९ साली आघाडी शासन सत्तेत आल्यावर झाली होती. पहिल्याच वर्षी धरणाच्या भिंतीचे काम ७० टक्के पूर्ण झाले होते. परंतु विदर्भ, मराठवाड्याचा जलसिंचनाचा अनुशेष भरून काढण्याच्या नावाखाली या धरणास आर्थिक बळ मिळाले नाही. प्रकल्पग्रस्तांची ऐच्छीक पुर्नवसन प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाली होती. २०२१ साली तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी याठिकाणी कामाची पाहणी केली होती व अधिकाऱ्यांना काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या धरणामुळे बिबी, सुरूल, म्हावशी या गावच्या शेतीच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघण्यास मदत होणार आहे.

# गणेशोत्सव उत्साहात व शांततेत साजरा करावा - सहा.पोलीस अधिक्षक डगळे

## डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच परंपरा कायम ठेवत यंदाचा गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात तसेच डॉल्बीमुक्त वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक रखुमाई पोलीस संकुल येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.दीपक धोत्रे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, टी वाय मुजावर,पोलीस पाटील, रेखा घनवट, मूर्तिकार डीजेचे मालक तसेच शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे प्रतिनिधी उपस्थित होते.



यावेळी सहा. पोलीस अधीक्षक श्री.डगळे म्हणाले, नागरिकांना ध्वनीप्रदुषणाचा त्रास होवू नये. यासाठी डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा. लेजर शोचा वापर टाळावा. पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची स्थापना करावी. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाचा रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत.

महिला, वृद्ध व बालके यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपयोजना कराव्यात. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकांसाठी जे मार्ग तसेच विसर्जनाची जागा निश्चित केले आहेत त्या ठिकाणी विसर्जन करावे तसेच मिरवणुकीसाठी दिलेल्या वेळेची मर्यादा पाळावी.गणेशोत्सव साजरा करताना कुणाच्याही भावना दुखावणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. सोशल मिडियावर तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करु नयेत. मंडळांनी स्वयंसेवक नेमावेत. तसेच सीसीटीव्ही लावावे. जाहिरात फलक लावतांना आवश्यक परवानगी घ्यावी. जाहिरात फलकावरील मजकुर जातीय, धार्मिक द्वेष निर्माण करणारे नसावेत. वर्गणीसाठी कुणावर ही जबरदस्ती करु नये, विसर्जनावेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. उत्सव साजरे करताना कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री ढगळे यांनी केले आहे.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले गणेशोत्सव हा सर्वांचा आवडता सण आहे. हा सण सर्वजण जल्लोषात व उत्साहात साजरा करतात. यावर्षी देखील गणेशोत्सव साजरा करतांना कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

गणेश मंडळांनी देखावे, आरास करतांना शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित आरास करावी. गणेशोत्सवाबाबत गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी, सूचनांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच नगरपालिका प्रशासनाकडून गणेशोत्सवानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुगी, मोकाट जनावरे तसेच आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले. यावेळी विविध गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच काही सुचना मांडल्या.

# बाळासाहेबांच्या व दिघे साहेबांच्या उद्घाटनाची शिळा कोपऱ्यात - शिंदेंना दिसली नाही का? - ॲड.मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे यांनी ठाणेतील गडकरी रंगायतनच्या नूतनीकरणाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली.

ॲड.रोहिदास मुंडे म्हणाले की, १९७८ साली शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते ठाणे येथील गडकरी रंगायतनचे उद्घाटन झाले होते. त्या वेळी त्यांच्या हस्ते उद्घाटनाची शिळा देखील



उभारण्यात आली होती. व ती दर्शनीय स्थली होती मात्र नूतनीकरण झाल्यानंतर ती शिळा कोपऱ्यात ठेवण्यात आली. १५ ऑगस्ट २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटन करताना त्यांना बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांच्या हस्ते झालेल्या उद्घाटनाची शिळा दिसली नाही का? की त्यांना फक्त राजकारणासाठीच बाळासाहेबांचे व आनंद दिघे यांच नाव आठवते?

ॲड.रोहिदास मुंडे पुढे म्हणाले की, स्वतःला आनंद दिघे साहेबांचे शिष्य म्हणवणारे, आणि खरी शिवसेना चालवतो असा दावा करणारे शिंदे यांनी या अपमानाविरुद्ध आवाज उठवला नाही, हे जनतेच्या नजरेतून सुटणार नाही. ज्यांना आपल्या थोर नेत्यांचा सन्मान राखता येत नाही, त्यांच्याकडून शिवसेनेचा वारसा जपला जाईल अशी अपेक्षाही ठेवता येत नाही. शेवटी मुंडे यांनी ठाम शब्दांत सांगितले की, खरी शिवसेना ही विचार, निष्ठा आणि जनतेच्या आशीर्वादावर उभी आहे. बाळासाहेब आणि आनंद दिघे साहेबांचा वारसा टिकवणारी खरी शिवसेना आज उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालीच आहे, आणि याबाबत जनतेमध्ये कोणताही संभ्रम नाही.

# थोडक्यात

## बाप्पाच्या स्वागतासाठी गणेश मंडळांकडून मंडप उभारणी सुरू

**अक्षराज : शिवराज मूगले**

**दि.२२, सोलापूर :** गणेशोत्सव अवघ्या ५ दिवसांवर येऊन ठेपला आहे. लाडक्या गणरायाचे धूमधडाक्यात स्वागत करण्यासाठी सार्वजनिक मंडळांची धाम धूम सुरू झाली आहे. त्यामुळे मंडप उभारणीच्या कामाला सुरवात झाली आहे. दरम्यान, यंदा बाप्पाचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यासाठी मंडळांनी निर्धार केला आहे. लाडक्या गणरायाचे आगमन बुधवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मंदूपसह ग्रामीण भागातील गणेश मंडळांकडून जोरदार नियोजन करण्यास सुरवात झाली आहे. यंदाच्या गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदारासह अन्य सदस्यांच्या निवडीचे काम सुरू आहे. त्यासाठी मंडळाकडून बैठकांचा भडाका सुरू झाला आहे. काही मंडळांचे पदाधिकारी व सदस्यांनी गणेशमूर्तींचे बुकिंगही केले आहे. दरम्यान, मंदूपसह दक्षिण तालुक्यातील विविध गावांमध्ये मंडळांनी मंडप उभारणीस सुरवात केली आहे. काही ठिकाणी मोठे डोम उभारले जात असून मंडळाच्या देखाव्याच्या आवश्यकतेनुसार मंडपाची रचना केली जात आहे. दरम्यान, विविध चौकांत मंडपासाठी लागणारे वासे, बांबू, पत्रे, लोखंडी खांब मंडपस्थळी येऊन पडले आहेत. यावर्षी काही गणेश मंडळे इतरांपेक्षा अनोख्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या पद्धतीने मंडप उभारणी सुरू केली आहे. मंडपासह मोठे स्टेज ही उभारला जाणार आहे. पावसापासून गणेशमूर्तीसह डेकोरेशनच्या सुरक्षेसाठी पत्र्याचा मंडप आणि मोठा डोम उभारण्याला प्राधान्य दिले आहे. मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. रस्त्यांवर मंडप उभारताना रस्त्यावरील वाहनांना व पादचाऱ्यांना अडथळा होणार नाही, अशा पद्धतीने मंडप उभारण्याचे नियोजन केले आहे.

## रोटरी क्लब स्मार्ट सिटी चंद्रपूर तर्फे शालेय साहित्याचे वितरण

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२२, चंद्रपूर :** स्व.गोपाळराव वानखेडे विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव पोडे येथे रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी चंद्रपूर तर्फे शालेय विद्यार्थ्यांना नुकतेच टाय व बेल्ट चे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी चंद्रपूर चे अध्यक्ष तथा शाळेचे राज्यपुरस्कार प्राप्त प्राचार्य नरेंद्र बोबडे होते. तर विशेष अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी चंद्रपूर च्या सचिव डॉ.अनुप बांगडे यांची उपस्थिती होती.

डॉ.अनुप बांगडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा कुठल्याच बाबतीत मागे पडू नये आणि जिद्द व चिकाटी ने स्वतः चे अस्तित्व निर्माण करावे असे मौलिक मार्गदर्शन केले. रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीचे अध्यक्ष तथा प्राचार्य नरेंद्र बोबडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक शैक्षणिक अडचणीना सामोरे जावे लागते. अशा वेळी विद्यार्थी व पालक खचून जातो. त्यासाठीच आम्ही रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी तर्फे विविध उपक्रमाच्या माध्यमातून अशा विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी सहकार्य करीत असतो. आज सुद्धा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी दिसले पाहिजे. यासाठीच शाळेतील सर्व ३०० विद्यार्थ्यांना टाय व बेल्ट वितरित करणार आहे असे मनोगतातून आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते टाय व बेल्ट चे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस.कुचनकर यांनी तर आभार प्रदर्शन एस.सी.पावडे यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किनवट येथे श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**अक्षराज : कैलास राठोड**



**दि.२१, किनवट (नांदेड) :** वारकरी संप्रदायातील संत ज्ञानदेव, नामदेवांच्या परिवारातील संत न्हावी सेना महाराज यांची पुण्यतिथी दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी नाभिक समाजाचे तालुका अध्यक्ष सिताराम राचटकर यांच्या किनवट येथील प्रतिष्ठानात प्रतिमा पूजन करुन साजरी करण्यात आली. नाभिक समाजाच्या शहर व तालुका शाखेच्या वतीने पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संत सेना महाराजांच्या जीवन चरित्रावर अनेक मान्यवरांनी भाषण केले. याप्रसंगी नाभिक समाजाचे विभागीय सदस्य विजय पोलासवार, सुदाम सजणे, आडेलू शेर्लावार, माधव खेडकर, सुभाष हळदकर, विठ्ठल यादवकर, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, गंगाधर मुकनेपेल्लीवार, शिवन्ना कलगोटूवार, नरसिंग भागरथीवार, श्रीनिवास शेर्लावार, राजू हळदकर, महेश मुळकटे, ओम राचुटकर, गंगाधर गुंजलवार, प्रथम चिलरवार, दिपक यादवकर, गणेश जकनेवार आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नाभिक समाजाचे तालुकाध्यक्ष सिताराम राचटकर, शहराध्यक्ष अमोल हळदकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचलन करुन लक्ष्मणराव लिंगमपेल्लीवार यांनी आभार मानले.

## टिळकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद अनुषंगाने रूट मार्च संपन्न

**अक्षराज : विश्वनाथ शेणॉय**

**दि.२२, डोंबिवली (ठाणे) :** आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सण-उत्सव शांततेत, सुसंवादाने व सुरक्षिततेच्या वातावरणात पार पाडावेत यासाठी टिळकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. हा रूट मार्च आज सायंकाळी ५ वाजता विकासनाका, नवी गोविंदवाडी, कचोरे, कल्याण (पूर्व) येथून सुरू झाला. मार्गक्रमण इडणज बिल्डिंग, जय भारत नगर, दारूल उलूम रहमानीय मदरसा, जलशुद्धीकरण केंद्र रस्ता, गवळी देव मंदिर, जुबेदा मदरसा, गावदेवी चौक, पत्रीपूल, मोहनसृष्टी मार्गे होत कचोरे पोलीस चौकी येथे संपन्न झाले. या रूट मार्चसाठी डोंबिवली विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे तसेच टिळकनगर पोलीस ठाण्याचे (गुन्हे) पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली रामनगर पोलीस ठाणे विभागातील १२ पोलीस अधिकारी, ३२ अंमलदार, ४ सीआरएम मोबाईल, बीट मार्शल, दामिनी पथक तसेच १ पिटर मोबाईल असे पोलीस कर्मचारी व यंत्रणा सहभागी झाले होते. या रूट मार्चच्या माध्यमातून पोलीस प्रशासनाने नागरिकांमध्ये विश्वासार्हता, सुरक्षितता व शांततेचा संदेश दिला.